**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 3, Issue - 5, Sept-Oct – 2020
Bi-Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.589
Received on : 10/09/2020 Accepted on : 29/09/2020 Publication Date: 30/09/2020

# कोविड - 19 मधील जागतिक परराष्ट्र धोरण आणि भारता पुढील बदलती आव्हाने

**Mrs. Sunanda Anshul Raut**
Assistant professor (Chb)
Politics Science (department)
Dr. Madukarrao wasnik pws college nagpur
The Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University Nagpur, Maharashtra, India
Email - rautanu0@gmail.com

**सारांश :** पहिलं महायुद्ध, दुसरं महायुद्ध असो किंवा १९८०-९० मधलं शीतयुद्ध असो जगाची दोन महासत्तांच्या नेतृत्वात विभागणी झाली.पण सध्याचं जग नेतृत्वहीन आहे. इथं नेतृत्वाची लढाईच नाही. आणि हीच चीनच्या विस्तारवादी धोरणासाठीची मोठी संधी आहे. असं असलं तरी कोविडनंतरच्या जगातली सत्ताविभागणी खूप गुंतागुंतीची आहे. महासत्ताधीश अमेरिकेच्या बेजबाबदारपणामुळे हा गुंता आणखी वाढतोय. आणि याच गुंत्याचा चीन पुरेपूर फायदा उठवतो. असं असलं तरी जपान, ऑस्ट्रेलिया, भारत, न्यूझीलंड यासारख्या मध्यम आकाराच्या महासत्ता सामूहिक नेतृत्वाच्या बळावर जगाला दिशा दाखवू शकतात.

**मुख्य बिंदू:** कोविड-19 चा जागतिक अर्थव्यवस्था, समाज व्यवस्था, राज्यव्यवस्था, व विदेश नीती, लोकशाहीवरील परिणाम.

## १ प्रस्तावना:

जगभरच मानव स्वतःला खूप मोठा समजत आला आहे. असं दिसतं. पण निसर्ग मानवाला असा काही अचानक तडाखा देतो की, एका क्षणात होत्याचे नव्हते करून टाकतो. उदाहरणे म्हणजे महापूर, भूकंप, त्सुनामी आणि साथीचे रोग. एकीकडे माणूस अंतराळात जातो. राहतो परतही येतो. पण निसर्गाचं अंतरंग अजून माणसाला उलगडलेले नाही. हे आपणास मान्यच करावे लागेल. निसर्ग हा निसर्गच. तो काही देश, धर्म, भाषा, प्रांत, श्रीमंती, गरिबी अशा मानव निर्मित बाबी पाहत नाही. जसा तो प्रेमळ असतो, तसाच तो वेळ प्रसंगी अत्यंत निष्ठुर होतो.

आता हेच पहा ना, २०-२० ही परिभाषा क्रिकेट मुळे भारतात परिचित आहे. त्यात हे वर्ष २०२०! किती उत्साहात सुरू झाले, किती नवनवीन योजना, उपक्रम आपण हाती घ्यायचे ठरवले आणि बोलता बोलता क्षणोक्षणी सर्वच काही बदलत आहे, ते कोरोना मुळे!

कोरोना कोरोनाचा अर्थ मी शब्दकोशात शोधला तर सापडला नाही. पण कोरोनेशन या शब्दाचा अर्थ म्हणजे राजा किंवा राणीचा राज्याभिषेक असा शब्दकोशात आहे. कदाचित त्या वरून कोरोना शब्द निर्माण झाला असावा, असे वाटते.

जागतिक स्थिती चीनच्या वुहान येथून सुरू झालेल्या या आजाराने बघता बघता जागतिक साथीचे रूप धारण केले आहे. कोरोनाचे संकट ओळखून जागतिक आरोग्य संघटनेने ११मार्च २०२० रोजी कोरोनाला “जागतिक साथ” म्हणून जाहीर केले आहे. या क्षणी म्हणजेच २० मार्च २०२० सकाळी ९.४४ वाजेपर्यंत जगात कोरोनामुळे २ लाख ४६ हजार ७९९ व्यक्ती बाधित होती. आतापर्यंत २४,९३५,९२५ बाधित ८,४१,८३८ मरण पावले आहेत.

भारतीय स्थिती भारतात आतापर्यंत कोरोनाचे ३४,६८,२७२ बाधित आढळून आले आहेत. तर ६२,७५०जण मरण पावले

मला एक गोष्ट आवर्जून नमूद करावी वाटते, ती अशी की, साथीचे रोग म्हटले की, दोन इंग्रजी शब्द पुढे येतात. एक म्हणजे एपिडमिक (Epidemic)आणि दुसरा पेन्डेमिक (Pandemic) जर एपेडेमिक शब्द शोधला तर अर्थ मिळतो ‘साथीचा रोग’ आणि पेन्डेमिक शब्दाचा अर्थ येतो ‘साथीचा रोग ज्याचा प्रसार संपूर्ण देशभर अथवा खंडभर झालेला आहे’. म्हणजे या दोहोंमधील फरक हा त्यांच्या प्रसाराच्या तीव्रतेवर अवलंबून आहे. जागतिक आरोग्य संस्थेने (WHO) पेन्डेमिक ची व्याख्या ‘नव्या रोगाचा जगभर झालेला प्रसार’ अशी मांडली आहे. म्हणूनच, 11 मार्च 2020 ला जागतिक आरोग्य संघटनेने अधिकृतरीत्या COVID-19ला पेन्डेमिक घोषित केले त्याचे कारण होते, या रोगाचा जागतिक स्तरावर झालेला प्रसार व त्याची तीव्रता.

## २ कोविद-१९ चा जागतिक अर्थव्यवस्था, समाज व्यवस्था, राज्यव्यवस्था व लोकशाही वर होणारा परिणाम:

कोरोना नंतरचे जग हा केवळ संकट असणार नाही तो आधीच संधिकाल आणी मग संधीचा काळही ठरू शकणार आहे. त्यासाठी तीन गोष्टी महत्त्वाच्या ठरणार आहेत.

१. एक तर, या संधींचा फायदा घेण्यासाठी आवश्यक असणारी समज, सहिष्णुता, सर्वसमावेशकता आणि प्रतिभा सरकारमध्ये असायला हवी.

२. दुसरे म्हणजे, जागतिकीकरणाचे आमूलाग्र बदलणारे स्वरूप आणि नव्या अर्थकारणाची दिशा समजायला हवी.'बर्लिन ते कोविड, व्हाया ब्रेक्झिट' असा हा प्रवास कसाअसेल, याविषयी आकलन हवे.

३. तिसरे म्हणजे, कोविडनंतरचे जग व्यक्तीला आणि राष्ट्राला अधिक सुटे करणार आहे.

अशावेळी एकसंधतेचीराष्ट्रवादाची अधिक सम्यक, सकारात्मक आणि उदार व्याख्या केली जायला हवी. जगभर आक्रमक राष्ट्रवादांचाउदय झालेला असताना, हे आव्हान अधिक खडतर आहे.पहिले महायुद्ध संपले, त्याला यंदा १०० वर्षे होत आहेत.अशावेळी नव्या आव्हानांच्या उंबरठ्यावर जग उभे आहे.

'कोरोना'नंतरचे जग आमूलाग्र बदललेले दिसेल. जगाचीचफेरमांडणी होणार आहे. औद्योगिक क्रांती, माहितीक्रांतीप्रमाणे नव्या क्रांतीच्या दिशेने जग चालले आहे.आजची महामारी आणि त्यावरून अमेरिका आणि चीनचीसुरू असलेली मारामारी, त्यातील जागतिक आरोग्यसंघटनेची कथित हेराफेरी आपण अनुभवतो आहोत.जगभर तयार झालेली चीनच्या विरोधातील संतापाचीभावना दिसत आहेच. पण, बदलणारे जग आणखी वेगळेअसणार आहे.

९ नोव्हेंबर १९८९ ला बर्लिनची भिंत कोसळली, तेव्हा जे जागतिकीकरण सुरू झाले, त्याचा 'ड्रायव्हिंग फोर्स

'आरोग्य' हा नव्हता. किंबहुना, जागतिकीकरणानंतर बाजारपेठांना सर्वाधिक महत्त्व दिले जात असताना, आरोग्य हा मुद्दा मात्र सर्वात कमी महत्त्वाचा होता. जागतिकीकरणानंतर चलनासोबत माणसंही जगभर जाणार आहेत, याचे भान तेव्हा आले नाही. जागतिकीकरणासोबत नवनव्या संसर्गजन्य आजारांनी जगाचा ताबा घेतला. गेल्या दोनशे वर्षांतही मिळून आले नसतील, एवढे साथीचे रोग एकविसाव्या शतकातआले.भांडवलीन फेखोरीत बुडालेल्या जागतिकीकरणाला तिकडे पाहायला वेळ नव्हता. उलटपक्षी, आजारांचाहीफायदा उचलण्याचा प्रयत्न जागतिकीकरणाने केला आणिऔषध कंपन्यांनी जगाच्या इतिहासात प्रथमच असेल,असा अवाढव्य फायदा कमावला. शस्त्रं विकण्यासाठी युद्ध आणि औषधं विकण्यासाठी आजार आवश्यकचआहेत, अशी या नफेखोरीमागील 'उदात्त' प्रेरणा होती.'कोरोना'ने मात्र सगळयांनाच पार हादरवून टाकले आहे.अमेरिका- युरोपसह सगळे कोलमडले आहेत. चीनकडे संशयाची सुई असली तरी कोरोनामुळे चीनचे नुकसानही कमी झालेले नाही. शिवाय, जैविक हत्यार म्हणून वापर करावा, असा हा विषाणू नाही. तो अनाकलनीय आहे

आणि त्याचे वर्तन अनपेक्षित आहे. एखाद्या गूढभयकथेच्या नायकासारखा हा विषाणू चीनने जैविक अस्त्र म्हणून वापरला असेल, असे ठोस पुरावा येईपर्यंत सांगणे शक्य नाही. कोरोना' एवढ्यात जाणार नाही. गेल्यासारखा वाटला म्हणून पुन्हा त्याची नवी भरतीची लाट येणार नाही, असे नाही. त्याचे जे काही व्हायचे ते होईल. पण,
'कोरोना'नंतरचे (अथवा 'कोरोना'सोबतचे) जग वेगळे असणार, याबद्दल भाष्य करता येऊ शकते.

आता 'फिजिकल डिस्टन्सिंग' नावाचे प्रकरण हा जगाचा स्वभाव होत जाणार आहे. 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'चे नवे पर्व सुरू होणार आहे. त्यामुळे शाळा-कॉलेजविद्यापीठे, माध्यमे यांचे आजचे
हे स्वरूप पूर्णपणे 'डिजिटल' होत जाणारआहे. सामूहिक स्तरावरच्या कृती हळूहळू कमी होत जाणार आहेत. लाखोंची गर्दी वगैरे उन्मादी कार्यक्रम
आता ट्रम्प वा मोदींनाही करणे अवघड जाणार आहे!मनोरंजन, पर्यटन, शिक्षण, क्रीडा, माध्यम, सेवा क्षेत्रासह एकूणच अर्थकारणाला त्याची प्रचंड झळ पोहोचू लागलीआहे.

आपल्यासाठी सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे 'कामगार' हीसंकल्पना बदलून जाणार आहे. काही अर्थाने ती कालबाह्य होणार आहे. भारतासारख्या देशात हा कळीचा मुद्दा आहे .

शक्य तिथे कामगार नकोत , या दिशेने नवी अर्थव्यवस्था आकाराला येणार आहे . प्लेग , डेंगी , चिकनगुणिया , सार्स , इबोला , स्वाइन फ्लू , कोरोना असे साथीचे रोग गेल्या वीस वर्षांत एकामागोमाग एक सतत जागतिक होत असताना तर मनुष्यबळ कमी करणे हाच त्यावरचा उपाय मानला जाणार आहे . यंत्रांमुळे आणि तंत्रामुळे माणसांचे रोजगार यापूर्वीही गेले आहेत . पण , त्यातून नवे रोजगार निर्माण झाले . आताही असे नवे रोजगार तयार होतील . त्यासाठी नवी कौशल्ये आत्मसात करावी लागतील . पण , मुळात कामगारच नकोत , हे नव्या क्रांतीचे सूत्र असल्याने या ' रिस्किलिंग'लाही मर्यादा येणार आहेत

**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** **ISSN: 2581-6241** **Volume - 3, Issue - 5, Sept-Oct – 2020**
**Bi-Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal** **Impact Factor: 3.589**
**Received on : 10/09/2020** **Accepted on : 29/09/2020** **Publication Date: 30/09/2020**

. तसेही , उद्योजकांना लोकांशी डील करण्यापेक्षा यंत्रे अधिक भरवशाची वाटतात . कोरोनामुळे ते ' एक्स्ज्यूज ' आयते मिळणार आहे . ही नवी ' इकॉनॉमिक वर्ल्ड ऑर्डर ' उत्पादन , उत्पादक , नफा अशा सगळ्याच गोष्टींचे संदर्भ बदलवून टाकणार आहे . ही सुरूवात या आधीही झाली होती . आता त्याला गती मिळणार आहे , इतकेच नाही , तर ती गती विलक्षण असणार आहे . सध्याही जगात सर्वाधिक मोठ्या कंपन्या कोणत्या आहेत ? गुगल , फेसबुक , अलिबाबा , अँपल या सर्व टेक कंपन्या आहेत . ' डेटा ' हे आता नवे इंधन झाले आहे . तीच सत्ता आहे . आणि , युद्धांचे संभाव्य कारणही . पण , युद्धसुद्धा ' डिस्टन्सिंग'च्या सूत्रानेच आता लढले जाणार आहे . बखरीतील ' दोन मोती गळाले , दहा - वीस अश्रफी गेल्या , खुर्दा - रुपयांची तर गणतीच नाही अशी वर्णने आता युद्धांचीही असणार नाहीत . याचा सगळ्यात मोठा फटका बसणार आहे तो अविकसित आणि विकसनशील देशांना . आपल्या गावी पायी निघालेल्या रक्तबंबाळ पायांचे या नव्या व्यवस्थेत काय होईल ? ' डिजिटल डिव्हाइड ' एवढा प्रचंड असताना या तांड्यांचे काय होईल ? या तांड्यांमधील विद्यार्थ्यांचे काय होईल ? नवनवी रेव्हेन्यू मॉडेल्स, स्टार्टअप्स उद्या तयार होतीलच , माणसांची कामे रोबोही करू लागतील पण , एवढ्या मोठ्या जनसमुदायाचे , लोकसंख्येच्या घनतेचे काय करायचे , हा प्रश्न तेवढाच गंभीर आहे . भारताची लोकसंख्या अमेरिकेच्या चौपट आहे , हे आपल्याला माहीत असते पण अमेरिकेचे क्षेत्रफळ तरीही भारताच्या तिप्पट आहे. अशावेळी भारताने ' डिस्टन्सिंग'चे काय करायचे? मग, या आवाज नसलेल्या,डेटा नसलेल्या, 'आऊट ऑफ साइट ' जनसमुदायाने काय करायचे ? राजकारणात त्यांना ' एक व्यक्ती, एक मूल्य असेल , पण व्यवहारातले हे चित्र आपल्या लोकशाहीचे रुपांतर कशात करेल ? बाबासाहेबांनी व्यक्त केलेली ही चिंता प्रत्यक्षात येऊन प्रलयंकर पातळीवर जाईल का ? सरकारचे रुपांतर मग नफेखोर कंपनीत होणार का ? आरक्षण वगैरे सामाजिक न्यायाची चर्चा फक्त पुस्तकात करायची का? ' मागेल तसा पुरवठा ' आणि ' घेऊ शकेल त्याला संधी ' हेच सूत्र झाले,तर भारताच्या लोकशाही समाजवादाचे काय ? या देशाचे काय ? मग ' सोशल डिस्टन्सिंग ' हाच शब्द खरा ठरेल आणि वंचित जनसमूह असेच टाचा घासत मरतील . त्यांच्याकडे डेटा नसल्याने त्यांच्या बातम्या देण्यातही ' डिजिटल माध्यमां'ना रस नसेल ! नव्या काळात आणखीही बरेच काही होत जाणार आहे . सगळेच नातेसंबंध बदलतील . चौकटी मोडल्या जातील . नवी प्रारुपे येतील.लग्न कुटुंब शाळा या संस्था बदलतील(माणसं फिजिकली एकमेकांपासून दूर राहिल्यामुळं त्यांच्यातील बाँड्स अधिक घट्ट होत जातील आणि नात्यांचे स्वरूप अधिक उत्कट , प्रामाणिक होईल , असंही एका अभ्यासकाला वाटतं) सरकार आणि लोक हे नातेही बदलणार आहे . राज्यसंस्थेची प्रस्थापित भूमिका बदलणार आहे . राज्यसंस्थेतील आणि लोकशाहीतील ताण तीव्र होत जाणार आहेत. भारतासारख्या देशात धर्म,जात,वर्ग यांची मांडणी नव्याने केली जाण्याची शक्यता आहे . एकूण ' राष्ट्रराज्य ' या संकल्पनेला नवा आयाम मिळणार आहे आणि त्यासोबत संकुचिततेचे वैश्विकीकरण आकार घेणार आहे . ' Public Sphere ' म्हणून ' सोशल मीडिया'च्या आणि एकूणच माध्यमांच्या स्थानाची नव्याने मांडणी होत जाणार आहे . लोकशाही व्यवस्थेतील ' राजकारण ' लोकांच्या हातातून जाण्याची शक्यता कदाचित आणखी गतिमान होणार आहे नव्या ' कोरोना'सोबत जन्मणारे जगही नवे असणार आहे ! युवाल नोवा हरारी म्हणतात त्याप्रमाणे , ' यापूर्वी जग संकटात सापडले, तेव्हा अमेरिकेची भूमिका जगाचा तारणहार अशी होती. आज मात्र ही ' देशी ' अमेरिका स्वतःच्या चुकांपासून दूर पळण्यासाठी जगाचा वापर करत आहे. हा बदल ठळक आहे . कोणत्याच देशाकडे आज अशी ' जागतिक ' शक्ती नाही ! आज अमेरिका आणि चीन यांच्यात वैर आहे . पण अमेरिका आणि सोव्हिएत रशिया यांच्यातील पन्नास - साठ वा सत्तरच्या दशकातील शीतयुद्धाप्रमाणे ते नाही. तेव्हा अन्य देशांतील घराघरात रशियन वस्तू नव्हत्या . सैन्यदल हाच तेव्हा जगावर नियंत्रण ठेवण्याचा मार्ग होता . आजचे चित्र वेगळे आहे . त्यामुळे निवडणुकीच्या तोंडावर अडचणीत सापडलेले आपत्तीग्रस्त ट्रम्प भलेही आज मोदींचा जयजयकार करतील . मात्र , उद्या अध्यक्ष झाल्यावर ते जिनपिंग यांच्यासोबत आधी मैत्री करतील . कारण , मुळात अमेरिका धंदेवाईक आहे . आणि खुद्द ट्रम्प यांना नफेखोरीशिवाय कशातही रस नाही . आत्ममग्न चीनला चीनच्या फायद्याशिवाय आणखी कशाचे काही पडलेले नाही . त्यामुळे या बड्या देशांच्या संघर्षात भारताने हुतात्मा होण्याचे कारण नाही. आज चिनी मालावर बहिष्कार घालणे भारताच्या हिताचे नाही . चीनला अंगावर घेण्याची गरज नाही. ते ' पोलिटिकली करेक्ट ' नाही.साधी गोष्ट चीनने जगभरातील वस्त्रोद्योग आणि इलेक्ट्रॉनिक्स उद्योगांना तर आपल्याकडे आकृष्ट करून घेतलेच,पण भारतात ज्या पाचशे औषध कंपन्या आहेत , त्यापैकी ३०० वुहानमध्ये आहेत . जग जोडले गेले आहे . आपण ते तोडण्याची गरज नाही . ते तुटण्याची वेगळी प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता नाकारता येत नाही . पण,

भारताला चीनप्रमाणे असे ' मास स्केल उत्पादन ' भविष्यात करावे लागेल . किंवा अशा वाटा चोखाळाव्या लागतील . भविष्यासाठी आता स्वतःला तयार करावे लागेल . ते कसे करायचे ? भारतात ग्रामीण अर्थव्यवस्था , कुटीर उद्योग , लघु उद्योग , सहकार , शेती आणि शेतीवर आधारित असणारे उद्योग यांची या सरकारने तर आणखी वाट लावली आहे . खरे म्हणजे , आता जागतिक नव्हे , आपली आर्थिक प्रारूपे उभी करण्याचे आव्हान आहे . आपल्या देशाचा विचार करून अशी प्रारूपे घडवावी लागतील. त्याचवेळी जागतिक भानही ठेवावे लागेल. भारताच्या मिश्र

अर्थव्यवस्थेत ती स्पेस होती आणि जागतिकीकरणाचा स्वीकार करतानाही आपण ती मोठ्या प्रमाणात कायम ठेवली होती. अमेरिकेसोबत आण्विक करार करणारा आणि ' डेटा पर्वाला गती देणारा भारत तेव्हा अन्नसुरक्षा, मध्यान्ह भोजन, मनरेगा याविषयी देखील सजग होता . या सरकारने मात्र जागतिक अर्थकारणाला शरण जात , ' मेक इन इंडिया ' एवढा एकच उद्योग आजवर ' नेटा'ने सुरू ठेवला, ही खरी अडचण आहे . त्यामुळे ' कोरोना ' ही " इष्टापत्ती " आहे , असे सरकारलाच वाटत असेल , तर पुढचा रस्ता सोपा नाही .

चीनशी स्पर्धा करायची किंवा ' आत्मनिर्भर ' व्हायचे , तर आपली अंगभूत प्रारूपे उभी करण्यावर भर द्यावा लागेल . जागतिक स्तरावरील नव्या प्रारूपाशीही जुळवून घेऊन तसे कुशल मनुष्यबळ उभे करावे लागेल . त्या संधी घ्याव्या लागतील . आपण ' डिजिटल ' संदर्भात आधीपासूच आघाडीवर असल्याचा तिथे मोठा फायदा होईल.त्याचवेळी , आरोग्य , शिक्षण , शेती , ग्रामीण विकास , सामाजिक न्याय , महिला आणि बालविकास यावर भारतीय शैलीत- मूलभूत पद्धतीने, पण झपाटून काम करावे लागेल . शहरीकरणाची प्रस्थापित कल्पना बदलत ,गावे अधिक सशक्त करावी लागतील . सोबतच, इथल्या अर्थकारणाची वेगळी मांडणी करावी लागेल . आपल्या सामर्थ्याचा विचार लागेल . कल्याणकारी राष्ट्रराज्याची संकल्पना जपावी लागेल . तंत्रज्ञानासोबत विज्ञान , विवेक आणि सर्वसमावेशकतेला पाया मानावा लागेल. नियोजनाला मानवी चेहरा लागेल ज्या गोष्टींची प्रत्यक्ष निर्मिती होऊ शकते , ते उद्योग चीनकडे , तर ' आर्टिफिशियल इंटेलिजन्स ' आणि ' टेक जाएंट्स ' अमेरिका वा युरोपकडे असे असेल तर भारताचा नक्की रस्ता कसा असेल ? रोजगाराच्या निर्मितीचा आराखडा कसा असेल ? पण , यावर काम करावे लागेल . जगालाच काम करावे लागेल . कोणी सांगावे, या प्रक्रियेचा परिपाक म्हणून बलाढ्यांच्या चिरेबंदी वाड्याला तडेही जातील ! इथे आपल्या नेतृत्वाच्या प्रतिभेचा, प्रज्ञेचा आणि प्रागतिकतेचा कस लागणार आहे ! ' आम्ही भारताचे लोक ' म्हणून आपणही हे केवळ सरकारवर सोडून चालणार नाही . सिव्हिल सोसायटी ' म्हणून आपल्याला हस्तक्षेप करावा लागेल .

### ३ कोविडनंतर जग कसं विभागलं गेलं :

‘सध्या जग कधी नव्हे एवढं आर्थिक आणि सैनिकी डावपेचांच्या बाबतीत मोठ्या अनिश्चिततेला सामोरं जातंय. आपल्या भागातसुद्धा १९३०-१९४० मधे जागतिक आणि प्रादेशिक व्यवस्था कोलमडून पडली होती, तसाच धोका आता निर्माण झालाय. १९३० च्या आणि आत्ताच्या परिस्थितीवर नजर टाकली तर यातला धोका आपल्याला सहज नजरेला पडेल. २०२० हे वर्षसुद्धा अनेक संकटं घेऊन आलंय. अशाच परिस्थितीला आपण १९३० मधेही सामोरे गेलोय. त्यासाठी आपली संरक्षण यंत्रणा सक्षम असायला हवी.’ – स्कॉट मॉरिसन, ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान

इंडो-पॅसिफिक परिसरात चीन आणि अमेरिका यांच्यातल्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर ऑस्ट्रेलियानं १ जुलैला आपल्या संरक्षण खर्चात ४० टक्क्यांची वाढ केलीय. येत्या १० वर्षांत अडीच कोटी लोकसंख्या असलेला ऑस्ट्रेलिया सैन्यावर तब्बल २७० अब्ज ऑस्ट्रेलियन डॉलर खर्च करणार आहे. इंडो-पॅसिफिक भाग हा सध्या जगात सामरिकदृष्ट्या सर्वांत धगधगता बनलाय. त्यामुळे आपण संरक्षण खर्चवाढीचा निर्णय घेतल्याचं ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधानांनी संसदेतल्या भाषणात सांगितलं. मॉरिसन यांनी सध्या भारत आणि चीन यांच्यात सुरू असलेल्या सीमावादाचाही उल्लेख केला. चीन आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातल्या कुरबुरी गेल्या काही दिवसांत खूप वाढलाय.

### ४ स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी :

१ सप्टेंबर १९३९ ला सुरू झालेलं दुसरं महायुद्ध जवळपास पाच वर्ष चाललं. आणि २ सप्टेंबर १९४५ ला संपलं. हे युद्ध संपताच जगभरातल्या नेत्यांनी पुढाकार घेऊन २४ ऑक्टोबर १९४५ ला संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना केली. असा युद्धप्रसंग पुन्हा उद्भवू नये, तसंच जगभरात शांतता प्रस्थापित करणं हा यूएनच्या स्थापनेमागचा हेतू होता.

पहिल्या महायुद्धानंतरच यूएनच्या स्थापनेसाठी अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी पुढाकार घेतला. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष फ्रँकलिन रुझवेल्ट, ब्रिटीश पंतप्रधान विन्सटन चर्लिल यांच्या नेतृत्वात यूएनच्या स्थापनेचं स्वप्न साकार झालं. पण आता त्याच अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी यूएनची एक संस्था असलेल्या जागतिक आरोग्य संघटनेला आर्थिक पाठबळ देणार नसल्याचं जाहीर केलंय.

महासत्ताधीशच आपमतलबी झाल्यामुळे सध्याचं जग नेतृत्वाच्या शोधात आहे. स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी तसं सध्या सारं जग भरकटलेल्या स्थितीत आहे. याच स्थितीचा चीन फायदा उठवतोय.

**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 3, Issue - 5, Sept-Oct – 2020
Bi-Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.589
Received on : 10/09/2020 Accepted on : 29/09/2020 Publication Date: 30/09/2020

**५ आपल्या परराष्ट्र धोरणाला अमेरिकी वळण द्या :**

आर्थिक सुरक्षिततेमधेच राष्ट्रीय सुरक्षिततेचा अजेंडा दडवून चीनी ड्रॅगन जगभरात विस्तारवादी धोरण राबवतोय. कोरोना संकटानंतर जगाची जुनी घडी विस्कटू लागलीय. दुसरीकडे नवी घडी बसवण्यासाठी काही देशांनी पुढाकार घेतलाय. द क्वाड्रिलॅटरल सिक्युरिटी डायलॉग म्हणजेच क्यूसिड यालाच क्वॉड नावानं ओळखलं जातं. या अनौपचारिक धोरणात्मक संवाद समुहामधे अमेरिका, भारत, जपान आणि ऑस्ट्रेलिया यांचा समावेश आहे.

२००७ मधे जपानचे पंतप्रधान शिंजो अबे यांनी अशा समुहाचा प्रस्ताव मांडला होता. त्याला भारतासह अमेरिका आणि ऑस्ट्रेलियानं पाठिंबा दिला. त्यानंतर दरवर्षी या समुहाची बैठक होते. पण गेल्या काही वर्षांत भारतानं क्वॉडमधला आपला सहभाग मर्यादित केला होता. आता चीनसोबतच्या संघर्षानंतर पुन्हा एकदा भारतानं क्वॉडमधे सक्रीय सहभाग नोंदवावा, असं परराष्ट्र धोरणाच्या जाणकारांचं म्हणणं आहे.

सीमेवर चीनसोबतच्या निर्णायक संघर्षामुळे अनेक जाणकार आता भारतानं आपल्या परराष्ट्र धोरणाला अमेरिकी वळण द्यावं. चीनविरोधी देशांना आपल्यासोबत घ्यावं, असं म्हणत आहेत. त्याशिवाय भारताकडे दुसरा कुठला मार्गही नसल्याचं या जाणकारांचं म्हणणं आहे. त्यासाठी भारतानं अमेरिकेसोबतच चीनविरोधातल्या इतर देशांशी मैत्रीपूर्ण संबंध दृढ केले पाहिजेत.

अमेरिका, जापान आणि ऑस्ट्रेलिया यांच्यासोबत मिळून क्वाड नेटवर्कला बळकटी द्यावी आणि या भागातल्या प्रादेशिक सुरक्षिततेच्या मुद्द्यावर काम करावं. दुसरीकडे फाईव आईज अलायन्स नावानं अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि कॅनडा या पाच देशांची एक संघटना आकार घेतेय. चीनी ड्रॅगनची वळवळ रोखणं हा या संघटनेचा अजेंडा आहे.

**६ चीनी ड्रॅगनची वळवळ :**

चार वर्षांपूर्वी जून २०१६ मधे अमेरिकेनं भारताला एक प्रमुख संरक्षण भागीदार म्हणून मान्यता दिलीय. महत्त्वाचं म्हणजे अशी मान्यता मिळालेला भारत एकमेव देश आहे. पण भारताचं संभाव्य अमेरिकी वळण चीनच्या डोळ्यात खूपतंय. २० जूनला ग्लोबल टाईम्स चीनी सरकारच्या दैनिकामधे एक संपादकीय आलंय. त्यानुसार, 'चीनसोबतच्या सीमावादात भारताच्या कठोर भुमिकेमागं अमेरिकेचाही हात असू शकतो. अमेरिकेनं भारताला इंडो-पॅसिफिक रणनीती निश्चित करण्यासाठी भाग पाडलंय.

नवी दिल्ली म्हणजेच भारत सरकारला हे माहीत हवं की, चीन-भारत संबंधांत अमेरिकेकडून जे हातखंड वापरले जात आहेत, ते फारसे परिणामकारक ठरणार नाहीत.' एवढंच नाहीत तर या लेखात अमेरिका चीनवर नियंत्रण मिळवण्यासाठी भारताचा वापर करतोय, असाही दावा करण्यात आलाय.

सीमेवर भारताचे २० सैनिक शहीद झाल्याबद्दल अमेरिकेनं सहानुभूती व्यक्त केलीय. पण अमेरिकेला किती गांभीर्यानं घ्यायचं हाच सध्या मोठ्या काळजीचा प्रश्न आहे. डोनाल्ड ट्रम्पच्या नेतृत्वात अमेरिकेच्या बेजबाबदारपणामुळेच चीनी ड्रॅगनची जगभरातली वळवळ वाढलीय. नमस्ते ट्रम्पचा पाहुणचार हादडून गेलेल्या राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी महिनाभरातच अमेरिकेतलं कोरोना संकट सोडवण्यासाठी भारतानं हायड्रॉक्सिक्लोरक्वीनच्या गोळ्या दिल्या नाही, तर बघून घेण्याची भाषा वापरली. तसंच ट्रम्प यांच्यावर स्वतःच्या प्रतिमेपल्याड अमेरिकेशी, जगाशी काही देणंघेणं नसल्याचीही टीका होते.

**७ भारताचा जुना मित्र :**

सध्या जगात अमेरिकेशिवाय दुसरी महासत्ता नाही. पण सध्याच्या परिस्थितीत अमेरिका भारताच्या किती मदतीला येऊ शकतो, याबद्दल फायनान्शिअल टाईम्स या जगप्रसिद्ध अर्थ दैनिकाचे दक्षिण आशिया ब्युरो चीफ राहिलेले एडवर्ड लुसी यांची प्रतिक्रिया खूप बोलकी आहे. द वायरला दिलेल्या मुलाखतीत ते सांगतात, 'भारत आणि चीन संघर्ष हा काही सध्या अमेरिकेच्या अजेंड्यावरचा विषय नाही. अमेरिकेला युरोपातून आपलं सैन्य हटवायचं. त्यासाठी भारत आणि चीन यांच्या संघर्षामुळे आपण दक्षिण चीन समुद्रात आपले सैनिक तैनात करणार असल्याचं अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री माईक पॉम्पिओ म्हणतात.'

इथं एका गोष्टीची नोंद घेतली पाहिजे. अमेरिका आणि जपान यांच्यात अनेक वर्षांपूर्वी संरक्षण करार झालाय. यानुसार, कुणी जपानवर हल्ला केला तर अमेरिकी सैन्य जपानच्या मदतीला धावून जाईल. पण जपान आणि चीन यांच्यातल्या सेनकाकू-दायवू बंदरासंबंधीच्या वादात अमेरिकेनं कुठलाच हस्तक्षेप केला नाही. त्यामुळे चीनविरुद्धच्या लढाईत अमेरिका मदतीला येईल, असं ठोस सांगता येत नाही.

पण भारतानं स्वतःचं स्वतंत्र धोरण बाजूला सारून अमेरिकास्नेही परराष्ट्र धोरण अवलंबल्यास त्याचा भारताला फटकाही बसू शकतो. कारण सध्या दोन्ही देशांची हवामान बदल, व्यापार संरक्षणवाद यासारख्या काही मुद्द्यांवर वेगवेगळी

**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 3, Issue - 5, Sept-Oct – 2020
Bi-Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.589
Received on : 10/09/2020 Accepted on : 29/09/2020 Publication Date: 30/09/2020

मतं आहेत. अमेरिकेच्या बाजूनं झुकल्यास भारताला अमेरिकेच्या लहरीप्रमाणं आपलं धोरण ठरवावं लागेल. अमेरिकेच्या दबावाला बळी पडून काही महिन्यांपूर्वी भारतानं इराणकडून तेल आयात करणं थांबवलं.

इराण हा भारताचा खूप जुना मित्रदेश आहे. पण अमेरिकेनं इराणवर आर्थिक निर्बंध लादलेत. अनेक वर्ष भारत या आर्थिक निर्बंधांचा भाग नव्हता. पण आता भारतही यात सामील झालाय. सध्या देशात पेट्रोलच्या किंमती गगणाला भिडण्यामागं हेही एक कारण आहे.

### ८ चीनचा मदतीचा हात :

पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धात अनेक देशांनी दुसऱ्या देशांसाठी युद्ध लढलं. तशी स्थिती आता नाही. आता ज्याचं त्याला लढावं लागणार आहे. अशावेळी किती देशांचा पाठिंबा आहे, याला प्रत्यक्ष युद्धाच्या मैदानात खूप मर्यादित अर्थ उरतो. अमेरिकेचा पुढाकार असलेली नॉर्थ अटलांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशन अर्थात नाटो ही जगातली सर्वात मोठी, सर्वात शक्तिशाली सैन्य संघटना म्हणून ओळखली जाते. पण या संघटनेलाही गेल्या काही वर्षांत सदस्य देशांनी वाऱ्यावर सोडलंय.

अनेक देशांनी नाटोतून आपलं अंग काढून घेतलंय. आत्ताच्या परिस्थितीत अशी कुठली नवी सैन्य संघटना निर्माण होण्याच्या शक्यता फार कमी आहेत. दुसऱ्याच्या मदतीला धावून जाण्याची भावना कमजोर झालीय. परराष्ट्र धोरणात आपमतलबी भाव वाढलाय.

कोरोनानं प्रत्येक देश आपल्यापुरतं बघतोय. सर्वशक्तिमान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमेरिकेचं स्वतःभोवतीचं वर्तन तर साऱ्या जगाला चक्रावून टाकणारं आहे. अमेरिकेच्या आपमतलबी वागण्याची हीच संधी साधत चिनी ड्रॅगननं मात्र साऱ्या जगात आपलं मदतीचे हात पुढे केलेत. कोरोनाच्या संकटातून बाहेर पडण्यासाठी धडपडत असलेल्या युरोपियन देशांना हरेक प्रकारची मदत करण्यासाठी चीनकडून सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत.

संकटात मदतीला धावून येतो, तोच खरा मित्र या न्यायानं चीन मदतीला धावतोय. चीनी मीडियानुसार, मे महिन्यात चीनहून युरोपियन देशांत मालवाहू ट्रेनच्या हजारहून जास्त फेऱ्या झाल्यात. चीनहून युरोपचं अंतर जवळपास १२ हजार किलोमीटर एवढं आहे. ब्रिटन, जर्मनी, स्पेन, फ्रान्स या देशांना चीननं आपला मदतीचा हात दिला. याविषयी दिल्लीतला एका फ्रेंच मुत्सद्दी बीबीशी शी बोलताना म्हणाला, 'चीनी अर्थव्यवस्थाच आमच्या देशाच्या इकॉनॉमीचं गाडं हाकतेय. हे नको असलं तरी ते कटू वास्तव आहे. भविष्यातही खूप काळ आमचं भविष्य चीनसोबतच निगडीत राहणार आहे.'

### ९ निवडणुकीच्या राजकारणाची किनार:

चीनचा सध्या अमेरिकेसोबतच कॅनडा, स्वीडन आणि ऑस्ट्रेलिया यासारख्या पाश्चात्य देशांशी वेगवेगळया कारणावरून वाद सुरू आहे. पण चीनची आपल्याला या वादाशी काही देणंघेणं नसल्याची भूमिका असते. पाश्चात्य देश आपलं काही बिघडवू शकत नाहीत, याची चीनला खात्री आहे. पाश्चात्य अर्थव्यवस्थेचा गाडाच चीनवर अवलंबून आहे.

कोविडनंतरच्या जगात अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया, कॅनडा या देशांनी चीनविरोधात उघड उघड भूमिका घेतली. भारतानं मात्र कुठेही चीनचा उघडउघड विरोध केला नाही. रशिया, ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स या पाश्चात्य देशांनी चीनबद्दल आपले पत्ते झाकूनच ठेवलेत. दक्षिण कोरियाशीही चीनचे वेळोवेळी वाद होतात.

जागतिक मॅन्युफॅक्चरिंग हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चीनशी कुणीच उघडपणे पंगा घेताना दिसत नाही. अमेरिकाचा म्हणजेच ट्रम्पचा चीनविरोधही किती खरा, किती खोटा हेही नोव्हेंबरमधे राष्ट्राध्यक्षपदाची निवडून झाल्यावरच कळेल. सध्याच्या चीनविरोधाला निवडणुकीच्या राजकारणाची किनार आहे.

### १० नेतृत्वहीन जग:

याउलट चीन भारताच्या विरोधात पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश या देशांचा वापर करतोय. सीएए आणि एनआरसीमुळे बांगलादेश भारतावर नाराज आहे. त्याचा फायदा उठवत चीननं बांगलादेशला जवळ करण्याचा प्रयत्न केलाय. गेल्या काही दिवसांत चीननं बांगलादेशातून येणाऱ्या ९७ टक्के वस्तुंवरचा आयात कर माफ केलाय. श्रीलंका चीनच्या आर्थिक मदतीखाली दबून गेलाय.

### ११ तर भारत चीनपेक्षा भारी मॉडेल उभं करू शकेलः थॉमस पिकेटी

कोरोना संकट कधी संपेल हे नेमकं सांगता येईना. पण कोरोना जगचं बदलवून टाकेल यावर जवळपास साऱ्या विचारवंतांचं एकमत दिसतंय. त्यामुळेच बदलेल्या या जगात आपला खुंटा बळकट करण्यासाठी अनेक देश संधीच्या शोधात

आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही नव्या जगात भारताला मोठी संधी असल्याचं म्हटलंय. या साऱ्या बदलांवर प्रसिद्ध फ्रेंच अर्थतज्ञ थॉमस पिकेटी यांनी सविस्तर मतं मांडलीत.

कोरोना वायरसनं अतिशय गोंधळाचं वातावरण निर्माण केलंय. वायरस काय करतो, अजून किती जणांचे बळी हा घेईल आणि कधी परत जाईल या सगळ्या प्रश्नांचं एकही निश्चित उत्तर आपल्याकडे नाही. या वायरसबाबत फक्त गोष्ट निश्चित आहे आणि ती म्हणजे हा वायरस साऱ्या जगात मोठी उलथापालथ घडवून आणणार आहे.

आता हे जग कसं बदलणार याचा अंदाज तज्ञांकडून लावला जातोय. जगप्रसिद्ध फ्रेंच अर्थतज्ञ, प्राध्यापक थॉमस पिकेटी कोरोनानंतरच्या जगाबद्दल काही इंटरेस्टिंग आणि गंभीर मतं मांडलीत. पिकेटी यांच्या पुस्तकांना जगभरात मोठी मागणी असते. पिकेटी सध्या "लंडन स्कूल ऑफ इकोनॉमी आणि स्कूल ऑफ ऍडव्हान्स स्टडीज अँड सोशल सायन्सेस इन पॅरिस" या दोन संस्थांमधे प्राध्यापक म्हणून काम करतात. एखाद्या अचानक आलेल्या संकटामुळे अर्थव्यवस्थेत आणि सामाजिक रचनेत कशाप्रकारे बदल होतात, हा त्यांचा अभ्यासाचा विषय आहे.

अलीकडेच एनडीटीवीचं मुख्य संपादक प्रणव रॉय यांनी प्रोफेसर पिकेटी यांची कोरोनाचं अर्थकारण आणि इतिहास यावर मुलाखत घेतली. कोरोना साथीनंतर होणाऱ्या आर्थिक आणि सामाजिक परिणामांबदद्ल ते बोलत होते. या सगळ्यात भारताने काय शिकावं, स्वतःत कोणते बदल करावेत आणि कोरोना वायरसनंतर बदलणाऱ्या जगात भारताचं काय स्थान असेल या सगळ्याविषयी प्रोफेसर पिकेटी यांनी अतिशय योग्य मार्गदर्शन केलं. त्यांच्या या मुलाखतीतले पाच महत्त्वाचे मुद्दे.

- **<u>ही तर भारतासाठी सुवर्णसंधी</u>**

भारतासारख्या विकसनशील देशांनी या संकटाकडे एक संधी म्हणून पहायला हवं. आपल्या सामाजिक व्यवस्था पूर्णतः विकसित करण्याची गरज या संकटानं निर्माण केलीय. ही एक संधीच आहे. आरोग्याच्या योजना, आरोग्य निर्देशक, आरोग्याच्या पायाभूत सुविधा आणि सुरक्षेच्या मुलभूत पद्धती यावर काम करण्यासाठी सरकारला प्रोत्साहन देणारं हे संकट आहे. कल्याणकारी राज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यसाठी भारताने आता जोमाने प्रयत्न करायला हवेत.

लॉकडाऊनचा हा बंदीवास आता यापुढे काम करणार नाही. लॉकडाऊन वाढला तर देशातल्या अनेक लोकांकडे दिवसातून दोनवेळा पोट भरू शकतील इतकीही संसाधनं उरलेली नाहीत. आता बाहेर जाऊन काम मिळवणं, पैसे कमवणं आणि त्या पैशातून अन्न खरेदी करून स्वतःला आणि आपल्या कुटुंबाला पोसणं ही लोकांची गरज झालीय. आरोग्य व्यवस्था आणि लोकांचं उत्पन्न वाढवायची, संपूर्ण विकासाची मिळवण्यासाठी धावणाऱ्या मोटारीची गती वाढवाची ही अभूतपूर्व संधी भारताला लाभलीय.

- **<u>राजकीय विचारसरणीचा अर्थव्यवस्थेवर परिणाम</u>**

भारताला याआधीही कोरोना वायरससारखे अनेक आश्चर्याचे धक्के बसलेत. भारतात अर्थिक धोरणं बनवणारी आणि सामाजिक असमानता परसरवणारी लोक ही राजकीय नेते मंडळी असतात. त्यामुळेच या दोन्ही गोष्टींवर त्या त्या राजकीय नेत्यांच्या विचारधारेचा परिणाम होत असतो. दिवसेंदिवस हा प्रभाव आणखी वाढत जाताना दिसतोय. माझ्या "कॅपिटल अँड आयडीओलॉजी" या पुस्तकातही मी हेच सांगितलंय.

खरंतर, कोणत्याही योजना फक्त अर्थिक आणि तांत्रिक गोष्टींचा विचार करून बनवल्या गेल्या पाहिजेत. अर्थव्यवस्थेत तुम्ही कोणती विचारधारा घेऊन हस्तक्षेप करता आणि कोणत्या विचारधारेच्या जोरावर तुम्ही अर्थव्यवस्था चालवता, त्याचं संघटना करता या गोष्टी कोरोनासारखा मोठा धक्का बसल्यावर मोठ्या झपाट्यानं बदल होतात.

- **<u>राजकीय उलथापालथी होणं महत्त्वाचं</u>**

स्वीडनसारख्या देशात आज आपल्याला संपूर्ण समानता दिसते. पण या देशात कधीकाळी प्रचंड असमानता होती ही गोष्ट आज सांगूनसुद्धा कुणी विश्वास ठेवणार नाही. आत्ता तिथं एक माणूस एक मत अशी व्यवस्था आहे. पण १९११ पर्यंत एखादा माणूस श्रीमंत असेल तर त्याचं एक मत हे १०० मतांच्या बरोबरीचं मानलं जायचं. आणि गरीब लोकांच्या एका मताला कवडीचीही किंमत नव्हती. संपत्तीचं असमान वाटप कायम रहावं यासाठी निर्माण केलेली ही व्यवस्था होती.

संपूर्ण युरोपमधे किंवा अगदी जगातही इतकी असमानता दुसरीकडे कुठेच नव्हती. नंतर ट्रेड युनियन्स आणि स्वीडनमधल्या सोशल डेमोक्रेटिक पक्षानं तिथे प्रचंड मोठी उलथापालथ घडवून आणली. त्यानंतर निर्माण झालेला स्वीडन आपल्या नागरिकांना समतेची वागणूक देणारा एकमेव देश आहे.

**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** **ISSN: 2581-6241** **Volume - 3, Issue - 5, Sept-Oct – 2020**
**Bi-Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal** **Impact Factor: 3.589**
**Received on : 10/09/2020** **Accepted on : 29/09/2020** **Publication Date: 30/09/2020**

सांगायचा मुद्दा असा की असमानतेचं वास्तव सतत बदलत असतं, परिस्थिती खूप बदलते असते. त्यामुळे त्याकडे बघण्याचा एक ठराविक दृष्टीकोन ठेवणं मला पटत नाही. राजकीय उलथापालथी आणि कोरोनासारख्या नव्या संकटाला लोक कसं सामोरं जातात हे मला महत्त्वाचं वाटतं. अशी परिस्थिती भारतातही येऊ शकते.

- **<u>जागतिक सत्ता समीकरण बदलणार</u>**

चीनकडून आलेल्या या वायरसने सगळे हैराण आहेत. चीनविरोधी भावना जगभर पसरलीय. पण या वायरसबद्दलची सगळी माहिती देणारा चीन महत्त्वाचं स्रोत आहे. आता एक वर्षानंतर जगावरची चीनची सत्ता कमी होईल की वाढेल? मला वाटतं, वायरस येऊन गेला तरी चीनची अर्थव्यवस्था वाढतच राहणार आहे. हाच त्यांच्या सत्तेचा पाया आहे. त्यामुळे यापुढेही चीनची सत्ता वाढतच राहील.

साथरोग चीननं पसरवला की त्यांनी त्यातून जगाला बाहेर काढलं याबद्दल बोलायचं झालं तर यापैकी लोक नेमकं काय लक्षात ठेवतील हे सांगणं फार अवघड आहे. साथरोगाशी सामना करायचा असेल तर लॉकडाऊनचा बंदीवास लोकांवर लादणं गरजेचं होतं. आता चीन किंवा काही आशियाई देशांनी व्यवस्थितपणे लॉकडाऊन राबवला. तर अमेरिका आणि काही युरोपियन देशांना लॉकडाऊन यशस्वी करणं जमलं नाही.

अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांचं निवडणुकीय लोकशाहीचं मॉडेल आणि मुक्त बाजारपेठेची भांडवलशाही गेल्या काही वर्षांत कमजोर झालीय. ट्रम्पच्या निवडणुकीनंतर तर अमेरिकेच्या लोकशाहीची नैतिक प्रतिष्ठा फारच खालावलीय. पण त्याचबरोबर चायनीज मॉडेलमधले पारदर्शकतेचा अभावासारखे दुर्गुणंही सगळ्यांना माहीत आहेत. कम्युनिस्ट पक्षाचा पुढाकार असलेलं मॉडेल अशीच चीनची ओळख अजूनही आहे. अशा प्रकारचं मॉडेल जगातल्या कुठल्याही देशाला राबवायचं नाहीय. मीडियाचं स्वातंत्र्य, पारदर्शकता याची मागणी आज कोरोना वायरसच्या काळात जितकी जास्त केली जाते तितकी यापूर्वी कधीही केली जात नव्हती.

- **जागतिक बदलांमधे भारत कुठे सापडेल?**

पुढच्या काही वर्षांनी चीनपेक्षा जास्त आकर्षक मॉडेल म्हणून उभारी घेण्याची क्षमता भारताकडे आहे. पण त्यासाठी खूप वेळ लागेल. कारण भारताला आधी अंतर्गत असमानता घालवावी लागेल.

सरकारला सार्वजनिक आरोग्य सुविधांमधे आणि सार्वजनिक शिक्षण क्षेत्रात योग्य संसाधनांची गुंतवणूक करावी लागेल. कोरोना वायरसच्या संकटामुळे या दिशेनं पावलं टाकायची मोठी संधी भारताला मिळालीय.

**संदर्भसूची:**

1 www.bbc.com
2 www.maxmaharashtra.com
3 जागतिक आरोग्य संघटना वेबसाईट.
4 www.aksharnama.com
5 www.mediawatch.info
6 www.aplemsnasshstra.com
7 HTTPS://youtube/xyp3pp9w9j4
8 www.esakal.com/article-corona
9 www.loksatta.com/coronaworld
10 http//kolaj.in article Thomas pikrtty's interview-on-/NDTV english kg 7608277
11. http//kokan.in world aftercovid-19py226385.